Process Safety Beacon 20 YEARS ANNIVERSARY

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

www.aiche.org/ccps/process-safety-beacon

CCPS An AIChE Technology Alliance Center for Chemical Process Safety

aiche.org/ccps

या आवृत्तीचे प्रायोजक

DEKRA

www.dekra.us/process-safety

# जहाजावरील आगीच्या घटनांतून मिळालेले प्रक्रीया सुरक्षेचे धडे

एप्रिल २०२२





१२ जुलै २०२० रोजी अमेरिकन नौसेनेच्या बॉनहोम रिचर्ड नावाच्या जहाजावर, ते कॅलिफोर्नियातील सॅन दिएगो या बंदरात नांगरलेले असताना भीषण आग लागली. ती आग पुढे ५ दिवस जळत राहिली आणि जहाजाच्या १५ पैकी ११ डेकवर पसरली. आगीचे तापमान १४०० अंश फॅरनहीट (७५० अंश से.) पेक्षा जास्त वाढले. झालेले आर्थिक नुकसान ३ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त होते आणि जहाज सेवामुक्त करावे लागले होते.

आगीच्या घटनेनंतर अमेरिकन नौसेनेने बॉनहोम रिचर्ड जहाजावरील आगीच्या पूर्वीच्या १२ वर्षांच्या कालखंडातील जहाजावरील आगीच्या १५ घटनांचा अभ्यास केला. या अभ्यासामध्ये आगीना सुरुवात कशी झाली आणि त्या पसरल्या कशा या दोन्हीबाबत वारंवार घडणारे अनेक घटक निदर्शनास आले. नौसेनेच्या जहाजांवरील आगींमधील अनेक किरकोळ घटक असे आहेत जे प्रक्रीया उद्योगामध्ये आग लागण्याची किंवा लागलेल्या आगीचे रुपांतर भीषण दुर्घटनेत होण्याची संभाव्य कारणे बनू शकतात.

Reference: "Major Fires Review Executive Summary, Commander, U. S. Fleet Forces Command and Commander, US Pacific Fleet, July 15, 2021 (Release October 19, 2021). https://www.documentcloud.org/documents/21089015-for-release-major-fires-review-19-oct-21

## आपणास ज्ञात आहे का?

अमेरिकन नौसेनेच्या तपासातील काही निष्कर्ष प्रक्रीया उद्योगातील संयंत्राना लागू पडतात जसे:

- जहाजावर अनधिकृत सामान आणले गेले होते.
- ज्वलनशील आणि घातक पदार्थ चुकीच्या पध्दतीने हाताळले आणि साठवण्यात आले होते.
- कार्यपध्दतींचे पालन केले गेले नव्हते आणि तपासणी कार्यक्रम अप्रभावी होते.
- आगीची जोखीम विचारात न घेता अतिरिक्त प्रमाणात ज्वलनशील आणि घातक पदार्थ साठविण्यात आले होते.
- त्या ठिकाणी हॉटवर्कसाठी सर्वसमावेशक आढावा, मंजूरी अथवा परीक्षण करण्याची पध्दत आणि तात्पुरती अग्निशमन किंवा अग्नि प्रतिसाद यंत्रणा अस्तित्वात नव्हती.
- तेथील कर्मचारी आपात्कालीन दूरसंचार उपकरणे, अग्निशोधन आणि अग्निशामक यंत्रणा हाताळण्यात निपुण नव्हती.

## आपण काय करु शकता?

- जर आपल्या कारखान्यात ज्वालाग्राही, ज्वलनशील किंवा अन्य घातक रसायने वहन करण्यायोग्य पात्रांमध्ये हाताळली जात असतील तर अशी पात्रे अशी रसायने साठविण्याच्या नियम आणि मानकांची पूर्तता केलेल्या निर्धारित ठिकाणीच ठेवा.
- न वापरलेली रसायने, ती उत्पादन विभागात अनावश्यक असल्याची तुम्हाला खात्री झाल्यावर ताबडतोब निर्धारित ठिकाणी ठेवलेल्या पात्रांमध्य परत पाठवा.
- आपल्या कारखान्यातील हॉट वर्क व परवाना आवश्यक असणारी अन्य कामे करण्याच्या पध्दतींचे काटेकोरपणे पालन करा.
- हॉट वर्कबाबत विस्तृत चर्चा ज्यात आहे अशा अन्य बीकॉन्सची उजळणी करा. (६/२०१८, ५/२०२०, ८/२०२०, ८/२०२१, ३/२०२२, तसेच www.aiche.org वर "Beacon" ह्या शब्दाचा शोध घ्या).
- आपात्कालीन कवायतींमध्ये सहभाग घ्या आणि त्या कवायतीमदरम्यान तुमच्या निदर्शनास आलेल्या तृटींची माहिती द्या जेणेकरुन आपात्कालीन पध्दतींमध्ये सुधारणा करता येतील.
- जर आपल्या कारखान्यात नजिकच्या काळात आपात्कालीन कवायती झाल्या नसतील तर ती करण्यात यावी असे सुचवा.
- संदर्भित अमेरिकन नौसेनेच्या तपास अहवालाचे अवलोकन करा आणि आपल्या कारखान्याशी सुसंगत धडे मिळतात का पहा.

**बातम्यांमधील प्रक्रीया सुरक्षेसंबंधीत माहितीवर लक्ष ठेवा!**

©AIChE 2022. All rights reserved. Reproduction for non-commercial, educational purposes is encouraged. However, reproduction for any commercial purpose without express written consent of AIChE is strictly prohibited. Contact us at ccps_beacon@aiche.org or +1 646-495-1371.